फक्त सभासदांसाठी
वर्ष ४२वे, अंक ४था ❋ सप्टेंबर २०२३

सभा : मंगळवारी संध्या. ७.०० वा.
SNDT महाविद्यालय, रोटरी हॉल,
कर्वे रोड, पुणे ३८

# स्नेह सेवा

# मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी, पुणे

❋ अध्यक्ष ❋
नीलिमा भडभडे
मो. ९७६७९१६५४०

नोंदणी क्र. MAH /1528/06/Pune, दिनांक ७ सप्टेंबर २००६
पत्रव्यवहारासाठी पत्ता :
द्वारा-प्रबोध, १०७०, शुक्रवार पेठ, सुभाषनगर लेन नं. ६, पुणे ४११००२.
snehseva1981@gmail.com

❋ संपादक ❋
अविनाश गोहाड
मो.९८८१०९०७४४

## अध्यक्षीय

अध्यक्षीयच्या निमित्ताने स्नेहसेवा च्या आरोग्य प्रकल्पाचा आढावा घेत आहे. डॉ निरंतर आणि श्री दप्तरदार यांनी संकलित केलेली याविषयीची माहिती मला मिळाली, आणि स्नेहसेवाच्या ४० वर्षांच्या प्रवासात, प्रथम स्नेहसेवा ट्रस्ट, आणि नंतर मैत्रेय सोसायटी मार्फत, आरोग्य सेवेचे अनेक प्रकल्प राबविले आणि लोकहित साध्य करता आले त्याची जाणीव झाली.

सुरुवातीच्या काळात घराघरांमध्ये शिल्लक असलेली औषधे आणि अनेक डॉक्टरांकडून औषधांचे सॅम्पल्स गोळा करून, त्यांचे पृथक्करण करून, काही संस्थांना वाटत असू. आपले काही सदस्य, विशेषतः सौ पुष्पाताई दाणी, डॉ विद्या शर्मा, सौ सुनिता वाघ, आणि या कामासाठी वेळ देवू शकणारे स्वयंसेवक यांनी नेटाने ते काम केले. स्नेहसेवाच्या दवाखान्यांमध्ये गोळा केलेल्या औषधांमधून जेव्हा पुरवठा पुरेसा होत नव्हता, तेव्हा जेनेरिक औषधे विकत घेवून ती स्नेहसेवाच्या दवाखान्यांमध्ये उपलब्ध करून देवू लागलो. आफ्रिका ड्रग हाउस चे श्री प्रभाकर गोखले यांची भरपूर मदत झाली. ही औषधे नंतर आपटे फार्मा यांचेकडून घेवू लागलो.

पुण्यात विविध ठिकाणी दवाखाने सुरू केले: आनंदनगर व रामबाग (२००४), उजवी भुसारी कॉलनी (२००८), निवारा आणि मारुती मंदिर लक्ष्मीनगर (२०१०), गोसावी वस्ती कोथरूड (२०११), सातचाळ आणि राहुल गार्डन (२०१३), सुतारदरा आणि शृंगेरी मठ (२०१४), सागर कॉलनी (२०१५), श्रमिक वसाहत (२०१६). या दवाखान्यांसाठी जागा मिळवणे, जागा तयार करणे, दवाखान्यात लागणारे साहित्य जमविणे, डॉक्टर शोधणे व नेमणे, औषधे मिळवणे आणि दवाखान्यांची व्यवस्था बघणे हे जटील कार्य प्रथम श्री श्यामराव गोडबोले, आणि नंतर श्री व सौ खंडकर, डॉ. अरुण निरंतर आणि श्री विनोद दप्तरदार यांनी अत्यंत लक्षपूर्वक आणि जबाबदारीने केले. डॉ. ज्योती खंडकर यांनी एक दवाखाना सांभाळला. या दवाखान्यांमध्ये स्नेहसेवाने नेमून दिलेली माफक फी आकारून रुग्णांना उपचार केले जात असत आणि स्नेहसेवा औषधे पुरवीत असे.ही औषधे, डॉक्टरांना वाहनभत्ता, मदतनीसाचे मानधन, जागेचे भाडे इ. यासाठी मैत्रेय सोसायटी मदत करत आली आहे.

हे सर्व शक्य होत होते कारण श्री व सौ खंडकर, डॉ. अरुण निरंतर आणि श्री विनोद दप्तरदार यांनी अतोनात परिश्रम घेतले. जेव्हा या प्रकल्पांचा व्याप वाढत गेला आणि स्नेहसेवाकडे आरोग्य सेवेचा संपूर्ण खर्च उचलणे अवघड होवू लागले तेव्हा श्री विनायक खंडकर यांनी आव्हान स्वीकारून त्यांचे नातेवाईक आणि मित्रमंडळींकडून निधी गोळा केला, याचा विशेष उल्लेख केला पाहिजे. २००४ पासून १३ वर्षे श्री व सौ खंडकर यांनी ही सर्व जबाबदारी सांभाळली. त्यानंतर डॉ निरंतर आणि श्री दप्तरदार यांनी ती स्वीकारली. हे कार्य पुढे नेले पाहिजे.

आपले सदस्य डॉ. हरीश महाजन हे देखील त्यांच्या पौडयेथील दवाखान्यात स्नेहसेवातर्फे गरजूंसाठी उपचार करत आले आहेत. तसेच सिंहगड रस्त्यावरील श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान मतीमंद मुलांच्या निवासी शाळेतील ५० मुलांसाठी दर दोन महिन्यांनी तपासणी केली जाते. डॉ. निरंतर आवर्जून तेथे जातात. या शाळेला तेथील गरजेप्रमाणे आपण औषधे पाठवतो. ताम्हणी घाटामध्ये CASP तर्फे साप्ताहिक दवाखाने चालवले आहेत.

याशिवाय वेळोवेळी नेत्र, कान-नाक-घसा, अस्थीव्यंग, दमा विकार, स्त्री-रोग, हृदयविकार, या विकारांच्या तपासणीसाठी आणि रक्ततपासणीसाठी शिबिरे आयोजित केली आहेत.

हे सर्व कार्य मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी मार्फत आपण करतो.

काळ बदलला, रुग्णांची मानसिकता आणि अपेक्षा बदलल्या, त्यामुळे या दवाखान्याच्या प्रकल्पाच्या स्वरूपामध्ये बदल करणे आवश्यक झाले. स्नेहसेवाने दवाखाने चालवायचे

नाहीत, परंतु दवाखान्यांमध्ये मदतकार्य करावयाचे आणि उपचार आणि औषधे गरजूंसाठी उपलब्ध करून द्यावयाची आहेत.

आरोग्य प्रकल्पाचे हे कार्य पुढे नेले पाहिजे. तसेच हा प्रकल्प राबविण्याच्या नवीन कल्पना, नवीन योजना आखल्या पाहिजेत. सभासदांनी या योजनेमध्ये व्यक्तिशः, आणि आर्थिक योगदान व देणग्या मिळवून, अधिकाधिक सहभागी होण्याचा निश्चय केला पाहिजे.

**नीलिमा भडभडे**

## संगीतातून कायाकल्प

१ ऑगस्ट २०२३..

संगीतातून कायाकल्प या नव्या व सर्वसामान्यांना परिचित नसलेल्या विषयावर डॉक्टर स्मिता सोवनी यांचे माहितीपूर्ण भाषण झाले.

डॉक्टर सोवनी यांनी अतिशय सोप्या भाषेत संगीत आपल्या जीवनावर किती प्रभाव टाकू शकते, परिणामकारक होऊ शकते, आणि त्यामुळे आपल्या जीवनात कसा सकारात्मक बदल होऊ शकतो हे विशद केले.

नाद योगाचे महत्व आणि संवेदना जागृत करण्याचे महत्त्व त्यांनी सांगितले. आपल्याला असलेले ताण-तणाव, दुःख, विवंचना यांचे निवारण नाद योगाने कसे करता येईल याचे सुंदर विवरण डॉ. सोवनी यांच्याकडून ऐकण्यास मिळाले.

संगीताची भाषा सर्वव्यापी (युनिव्हर्सल) आहे. ते नुसत्या कानापर्यंत पोहोचत नाही तर आपल्या अंतरंगापर्यंत जाऊ शकते हे त्यांनी उदाहरणे देऊन विशद केले.

डॉ. सोवनी यांच्या ओघवत्या भाषाशैलीने सर्वांना मंत्रमुग्ध केले. भाषणातून त्यांच्या सखोल ज्ञानाचे व विचारांचे दर्शन झाले.

**संजय गर्गे**

## समान नागरी कायदा - समजून घेताना...

मंगळवार ८ ऑगस्ट २०२३.

समान नागरी कायद्यावर सध्या समाज माध्यमांवर बरीच चर्चा चालू आहे. टीव्ही , वर्तमानपत्रे, अगदी व्हाट्सप सुद्धा यात मागे नाही .

ही चर्चा ऐकताना एक गोष्ट जाणवते ती म्हणजे हा कायदा नक्की काय आहे? याचा आपल्यावर आणि समाजातील अन्य घटकांवर नेमका कोणता परिणाम होणार आहे? सध्याच्या कायद्यातील तरतुदी काय आहेत? याबाबत कोणालाच नीटशी माहिती नाही. त्यामुळे जो तो आपल्याला काय वाटते या बद्दल आग्रही मते मांडताना दिसतो आणि मुख्य म्हणजे या कायद्याबद्दल गैरसमजही अनेक आहेत. जसे की अल्पसंख्य लोकांना असे वाटते की आपल्यावर हिंदूसाठी असलेले कायदे लादले जातील वगैरे ..

सध्या हा ज्वलंत विषय असल्यामुळे आणि उलट सुलट चर्चा कानी पडत असल्यामुळे नेमकी माहिती मिळावी आणि हा कायदा का हवा याची माहिती व्हावी, यासाठी ८ ऑगस्ट २०२३ रोजी स्नेहसेवामध्ये या विषयातील तज्ज्ञ डॉ. जया सागडे यांचे भाषण झाले.

सुरवातीला श्री.पळसुले यांनी डॉ. जया सागडे यांची विस्तृत ओळख करून दिली.

डॉ. जया सागडे या स्त्री अभ्यास केंद्राच्या निवृत्त संचालिका आणि पुणे विधी महाविद्यालयाच्या निवृत्त उपप्राचार्या आहेत. त्यांनी पुणे येथील विधी महाविद्यालयातूनच कायद्याची पदवी घेतली आणि पुणे विद्यापीठातूनच त्यांनी कायद्याची Ph.d. ( विद्यावाचस्पती) प्राप्त केली. त्या नंतर त्यांनी कॅनडा येथील टोरोंटो विद्यापीठातून SJD ( डॉक्टर ऑफ सायन्स ) ही पदवी पण प्राप्त केली. त्यांनी ९० पेक्षा जास्त राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग घेऊन पेपर्स वाचले आहेत आणि त्या आंतरराष्ट्रीय नेटवर्कच्या संस्थापकीय सभासद राहिल्या आहेत. त्यांनी अनेक संशोधन प्रकल्पांवर काम केले आहे उदा. स्त्रियांचे संपत्ती वरील अधिकार, स्त्रियांचा पोटगी आणि जमिनीवरील अधिकार, स्त्रियांवर होणारी कौटुंबिक हिंसा, बालविवाह, दत्तक इत्यादी...

समान नागरी कायद्याच्या मसुद्यावरही त्यांनी काम केले आहे. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन - जिनिव्हा, ब्रिटिश ऑल पार्टी पार्लमेंटरी ग्रुप- लंडन, व अनेक नामवंत आंतरराष्ट्रीय संस्थामध्ये सल्लागार म्हणूनही त्यांनी काम केले आहे. त्यांनी राष्ट्रीय व राज्य महिला आयोग यांच्या बरोबरही काम केले आहे.

अशा या कायदे विषयातील मान्यवर व्यक्तीकडून स्नेहसेवा सदस्यांना समान नागरी कायदा या विषयावर माहिती मिळावी आणि या विषयावर समाज प्रबोधन व्हावे म्हणून डॉ. सागडे यांना आमंत्रित केले होते.

प्रथम त्यांनी सध्या या बाबतीत कायदा काय म्हणतो ते स्पष्ट केले... त्यातील काही मुद्दे महत्त्वाचे आणि अतिशय विचार करण्याजोगे आहेत-

आपल्याकडे काही ❊ धर्माधिष्ठित वैयक्तिक कायदे आहेत. ❊

हिंदू या शब्दाची व्याख्या नकारात्मक आहे. (म्हणजे जो ख्रिश्चन,मुस्लिम, पारशी. इत्यादी ... नाही तो हिंदू )

* आदिवासी जमाती हिंदू नाहीत असे कायदा म्हणतो.

* कुटुंब विषयक कायद्यामध्ये लग्न, घटस्फोट, पालकत्व, दत्तक, वारसा या गोष्टी समाविष्ट आहेत. या मध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे.

* सध्या काही कायदे हिंदू स्त्रियांच्या बाबतीत अन्यायकारक आहेत म्हणजे ते घटनेनं दिलेल्या समानतेच्या तत्वांना छेद देणारे आहेत. मूलभूत अधिकार हे स्त्री आणि पुरुष, सर्वांना सारखेच लागू असावेत असे घटना सांगते, पण सध्याच्या कायद्यातील काही तरतुदी या पुरुषांना झुकते माप देतात. विशेषतः संपत्ती वाटपाच्या बाबतीत हे प्रकर्षाने दिसून येते.

* मृत्यूनंतर मालमत्तेच्या वाटपासंबधी ज्या तरतुदी आहेत त्या घरातील स्त्री आणि पुरुषांसंबधी वेगवेगळ्या आहेत. ( स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या आहेत. )

* धार्मिक स्वातंत्र्य –प्रत्येकाला आपआपल्या धर्मानुसार आचार विचारांचे स्वातंत्र्य आहे. पण सार्वजनिक ठिकाणी वावरताना यावर काही निर्बंध असणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात हे होते का?

* हिंदू, ख्रिश्चन,मुस्लिम वगैरे धर्मीयांसाठी सध्या वेगवेगळे कायदे लागू होतात. या मध्ये कौटुंबिक नियमही वेगळे आहेत. ते त्या त्या धर्म, रूढी आणि परंपरा यांना धरून आहेत. कुटुंबातील संपत्ती वाटप, वारसांना मिळणारी संपत्ती, स्त्री आणि पुरुष वारसदारांना मिळणारे हिश्याचे प्रमाण हे प्रत्येक धर्मात वेगळे आहेत.

सार्वजनिक जीवनात वावरताना मात्र सर्व जणांना समान नागरी कायदा असावा, स्त्रियांवरील अन्याय्य तरतुदी दूर व्हाव्यात, अशी लोकांची अपेक्षा आहे. म्हणूनच आत्ता अस्तित्वात असलेल्या कायद्यात कालानुरूप बदल करून समान नागरी कायदा यावा अशी सरकारची इच्छा आहे. परंतु नवीन कायद्यात काय तरतुदी /बदल आहेत हे सरकारने स्पष्ट केलेले नाही.

याप्रमाणे डॉ जया सागडे यांनी सध्याच्या कायद्यातील तरतुदी, त्यातील त्रुटी छान समजावून सांगितल्या आणि ह्या कायद्यात कालानुरूप बदल का हवा आहे हेही अनेक दाखले आणि slides दाखवून स्पष्ट करून सांगितले.

शेवटी अंजली हतवळणे यांनी स्नेहसेवा सदस्यांचे अतिशय सुगम भाषेत प्रबोधन केल्याबद्दल डॉ. जया सागडे यांचे आभार मानले.

स्नेहसेवा सदस्यांचे अतिशय सुगम भाषेत प्रबोधन केल्याबद्दल अंजली हतवळणे यांची डॉ. जया सागडे यांचे आभार मानले.

**अविनाश जोशी**

## वर्धापनदिन विशेष

* दिनांक १९/८/२३ रोजी आपल्या स्नेहसेवा संस्थेचा ४२ वा वर्धापनदिन एसएनडीटी, रोटरी हॉल, पुणे येथे दिमाखात साजरा झाला.

* सभासदांनी विविध गुणदर्शनाचा (रंगारंग) कार्यक्रम सादर केला. या मध्ये अंजली हतवळणे यांनी देवीचे स्तुतीपर गीत सादर केले.

* विजय बागुल यांनी माऊथ ऑर्गन (बाजा) वर दोन हिंन्दी गाणी वाजवली.

* अंजली हतवळणे, सुनिता वाघ, संध्या भडकमकर, गीता भुर्के, विजया खोले, पोर्णिमा तोडकर यांनी देशभक्तीपर समुहगीत गायले.

* वसंत खरे यांनी स्वत: केलेल्या, मजेशीर ग्राफिटी सादर केल्या.

* विद्या शर्मा यांनी विनोदी इंग्रजी काव्य वाचन केले.

* सुनिता वाघ यांनी नृत्य सादर केले.

* गीता भुर्के यांनी वार्यावरची वरात या पु.ल. देशपांडे यांच्या नाटकातील एकपात्री प्रवेश सादर केला.

* हेमंत भागवत यांनी स्वरचित दोन कथा ऐकवल्या.

* नीला दाते यांनी 'केल्याने पर्यटन' या विषयावर त्यांचे देशविदेशातील प्रवासातले निवडक अनुभव सांगितले.

* घाटपांडे यांनी दिंवगत माजी पंतप्रधान अटलबिहारीजी वाजपेयी यांची कविता सादर केल्यावर कार्यक्रमाचा (रंगारंग) समारोप झाला.

या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली हतवळणे यांनी केले. नीलिमा भडभडे यांनी सहभागी सभासदांचे पुष्प देऊन कौतुक केले.

अध्यक्षा निलिमा भडभडे यांनी संस्थापक विश्वकुमार बडवे, जेष्ठ सभासद डॉ. पुरम, डॉ. पांडे, व प्रकाश यार्दी यांचा पुष्प देउन सत्कार केला.

डॉ. पुरम, डॉ. पांडे व प्रकाश यार्दी यांनी संस्थेच्या पूर्वीच्या कार्याचा आढावा घेतला व गतस्मृतींना उजाळा दिला.

काही माजी सभासद पण कार्यक्रमास उपस्थित राहिल्याने कार्यक्रमास आणखी शोभा आली. यानंतर ऑगस्ट महिन्यातील वाढदिवस पुष्प व भेटवस्तू देऊन साजरे केले.

श्रावण व वर्धापनदिनानिमित्त पुरणपोळीचे जेवण गट क्र. ५ व स्नेहसेवातर्फे देण्यात आले.

अशाप्रकारे सर्व कार्यक्रमाची सांगता आनंदाने झाली.

**अंजली हतवळणे**

## स्नेहसेवा वर्षा सहल

मंगळवार दिनांक २९ ऑगस्ट २०२३ रोजी स्नेहसेवा सभासदांची वर्षासहल जगताप वॉटर फॉल कान्हेफाटा मोरमरे (मौऊ) येथे गेली होती. सकाळी ६.४५ ला सर्वजण एसएनडीटी कॉलेजच्या गेटजवळ जमले होते. सात वाजता तेथून निघून साधारण साडेआठ वाजता वॉटरफॉलला पोहोचलो.

मिसळ, पाव, चहा, कॉफी असा पोटभर नाष्टा झाल्यावर सर्वजण वॉटरफॉलकडे धावले. डोंगरातून हा नॅचरल वॉटरफॉल खाली आल्यावर त्याच्या आजूबाजूला जरा रंगरंगोटी करून तो सजवला होता. तेथे पायऱ्या केल्या होत्या आणि खाली येणारे पाणी या पायऱ्यांवरून सोडले होते. या पायऱ्यांवरून वरपर्यंत चढून जाऊन पाण्यात भिजताही येत होते तसेच पाण्यातून चालताही येत होते.

डोंगरावर उतरणारे ढग, धूसर झालेले डोंगर, गर्द हिरवाई, पाण्याचे लहानमोठे वाहणारे धबधबे अगदी अवर्णनीय होते. डोंगरातून खाली येणाऱ्या पाण्यावर भातशेती लावली होती. त्या भातशेतीच्या वेगवेगळ्या हिरव्या रंगाच्या शेड्स मनाला भुरळ घालत होत्या. थोडेफार हिंडून फिरून झाल्यावर सर्वांनी गोल करून गट पाडून दीड तास गाण्याच्या भेंड्या खेळल्या.

भुर्के यांनी काही विनोदी लेखकांच्या साहित्यातील किस्से सांगून विनोदाची मेजवानी दिली. तोपर्यंत जेवणाची वेळ झाली. तांदूळ व ज्वारीच्या गरम गरम भाकरी, झुणका, पनीरभाजी, वरण, ठेचा, छोले उसळ, पिठले,भात, पापड, गुलाबजाम असा नामी बेत होता.

जेवण झाल्यावर थोडावेळ गेम्स खेळलो. त्यानंतर दोन गट करून त्यांना वेगवेगळ्या म्हणी दिल्या.

दहा जणांनी वेगवेगळ्या वेळी पुढे जाऊन त्या म्हणीना धरून एक एक वाक्य लिहायचे, अशी दहा दहा वाक्ये लिहिली. या स्पर्धेचे परीक्षण डॉ. विद्या शर्मा यांनी केले.

भगवंत कुलकर्णी यांनी इतिहासाचा दाखला देऊन घडलेली एक अतिशय विस्मयकारक प्रेमकथा सांगितली. गोष्टी सांगण्यात त्यांचा हातखंडा सर्वानाच परिचित आहे.

ही सहल पांडे यांनी व्यवस्थित आखल्यामुळे उत्तमप्रकारे पार पडली. बसची सोय दीपक भडकमकर यांनी केली होती. उज्वला नाईक यांनी कार्यक्रम उत्तम झाला म्हणून अध्यक्षा व सर्वांचे आभार मानले. त्यानंतर सर्वजण परतीच्या प्रवासाला लागले.

सहलीचे ठिकाण आपले माजी सभासद मागीकर यांनी सुचविले होते.

**सुनिता वाघ**

## सप्टेंबर महिन्यातील वाढदिवस
### जीवेत् शरदः शतम्

| | |
|---|---|
| डॉ. हरीष महाजन | १ सप्टें. |
| सौ. भाग्यश्री साठे | ५ सप्टें. |
| सौ. आसावरी भडकमकर | १० सप्टें. |
| सौ. अंजली भाटवडेकर | १५ सप्टें. |
| श्री. मुकुंद गायधनी | १५ सप्टें. |
| डॉ. भगवंत कुलकर्णी | १८ सप्टें. |
| श्री. विजय बागुल | २५ सप्टें. |
| डॉ.सौ. नीलिमा भडभडे | २९ सप्टें. |

## विशेष वार्ता...

आपल्या सदस्या सौ. उज्वला दीपक नाईक यांच्या सुनबाई, सौ. नेहा रणजीत नाईक या सिम्बॉयोसिस सेंटर फॉर मॅनेजमेंट स्टडीज पुणे, येथे असिस्टन्ट प्रोफेसर या पदावर कार्यरत आहेत, त्यांना सिम्बॉयोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी येथून **A Study Of Social Capital and Its Impact on Job Satisfaction Of Faculty Members** या विषयात ऑगस्ट महिन्यात पी.एच.डी. प्राप्त झाली आहे.

स्नेहसेवाच्या सर्व सभासदांतर्फे डॉ. नेहा यांचे अभिनंदन.ह्न

